# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-७२ दिनांक - ०२/०३/२०२४

## काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील दोन सराईत गुन्हेगार हद्दपार

काशिमिरा पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आरोपी नामे विशाल रमेश राजभर वय-२० वर्षे रा-रुम नं-१२, भवानी नगर चाळ, स्मशानभुमीच्या पाठीमागे, पेणकरपाडा, ता.जि. ठाणे याचे विरोधात मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय तसेच गुजरात राज्यातील वलसाड येथे जबरी चोरी, चोरी, फसवणूक व दुखापतीचे असे दखलपात्र-१८ व अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत.

तसेच काशिमिरा पोलीस ठाणे हददीत राहणारा सराईत गुन्हेगार आरोपी नामे मनोज भुजारत चव्हाण वय-३८ वर्षे, रा-रुम नं-२४/०६, सनराईज कंपनीच्यासमोर, माशाचा पाडा रोड, मिरारोड-पुर्व, ता.जि.ठाणे याचे विरोधात देखील काशिमिरा पोलीस ठाणे येथे मालमत्ता व शरीराविरुध्दचे असे एकूण-१० दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे दाखल आहेत.

वर नमुद दोन्ही आरोपी यांचेविरुध्द प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्यांचे वर्तनात सुधारणा न होता ते वारंवार गुन्हे करीत असल्याने व त्याचे बद्दल जनतेच्या मनात असुरक्षीततेची भावना निर्माण झाल्याने त्यांना काशिमिरा पोलीस ठाणे व आजुबाजूचे परिसरातून हददपार करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने सदर आरोपी यांचावर म.पो.का कलम-५६(१)(अ)(ब) अन्वये हददपारीची कारवाई करणे आवश्यक होते त्याबाबतचा अहवाल मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांना पाठविण्यात आला होता. त्यानुसार मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, मिरारोड-पुर्व यांनी आरोपी १) विशाल रमेश राजभर वय-२० वर्षे यास दि.२६/०२/२०२४ रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे, पालघर, रायगड या जिल्हयातून २ वर्षाकरीता हददपार करण्यात आलेले आहे. तसेच आरोपी २) मनोज भुजारत चव्हाण वय-३८ वर्षे यास दि.२९/०२/२०२४ रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगरे, ठाणे, पालघर, रायगड या जिल्हयातून २ वर्षाकरीता हददपार करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि पोलीस आयुक्तालय, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांचा मार्गदर्शनाखाली प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, विजयकुमार मराठे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, पोलीस निरीक्षक /कुमारगौरव धादवड, सध्या नेम-पेल्हार पोलीस ठाणे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/योगेश काळे, पोउनि/शिवाजी खाडे, सपोउनि-अजय मांडोळे, पो.हवा./मधुकर सावंत, पोह-०७१२८/सचिन पाटील, पोशि-१२०९८/प्रदिप काटकर, पोशि-१५०१५/प्रविण टोबरे, पोशि-१२१००/रवींद्र कांबळे यांनी कामकाज केले आहे.

------------------oo-------------------